महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैंनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे

Rs.2/-

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

गुरुवार ❖ २९ मे २०२५ ❖वर्ष ६ ❖अंक ३३० ❖ पाने - ४ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पत्रकार हवे आहेत

दैंनिक ठाणे जीवनदीप वार्ता करिता खालील ठिकाणी पत्रकार नियुक्त करणे आहे. इच्छुकांनी संपर्क करावा

• मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर • बोईसर • वसई • विरार• भाईंदर• पनवेल • वाडा • बदलापूर • शहापूर • आसनगाव • भिवंडी • कसारा • कर्जत• सरळगाव • म्हसा • धसई • अंबरनाथ • विठ्ठलवाडी • उल्हासनगर • टिटवाळा • शहाड • कोनगाव • आंबिवली • दिवा • कळवा

दैनिक 'ठाणे जीवनदीप वार्ता'
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टिस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.)
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९०८२६ ६४७८१
E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com

## सुरक्षित प्रवासासाठी

# 'एआय' तंत्रज्ञानाच्या स्मार्ट बसेस

**- उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : राज्य परिवहन महामंडळाच्या बस मधून प्रवास करणाऱ्या सर्वसामान्य प्रवाशांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य आहे. त्यासाठी 'एआय' तंत्रज्ञानावर आधारित सुरक्षा प्रणाली स्मार्ट बसेस मध्ये लावण्यात येणार असल्याने या नवीन बसेस प्रवासासाठी अधिक सुरक्षित असतील, असा विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला.





एसटी महामंडळाच्या ठाणे-नागपूर दरम्यान चालवण्यात येणाऱ्या 'स्मार्ट बस'मध्ये बसवण्यात आलेल्या आयटी सुरक्षा प्रणालीची पाहणी उपमुख्यमंत्र्यांनी आज ठाणे येथे केली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, एसटीचे अधिकारी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री.शिंदे म्हणाले की, सध्या दररोज सरासरी ५५ लाख प्रवाशांना दळणवळण सेवा देणाऱ्या एसटी बसमधील प्रवास अधिकाधिक सुरक्षित झाला पाहिजे. या उद्देशाने एआय तंत्रज्ञानावर आधारित " एकात्मिक सुरक्षा प्रणाली " नव्या बसेसमध्ये लावण्यात येणार आहे. चालकाच्या बस चालवण्याच्या पद्धती पासून बसमध्ये बसलेल्या प्रवाशांच्या हालचालीवर देखरेख करणाऱ्या सीसीटीव्ही कॅमेऱ्या सोबतच वायफाय, एलईडी स्क्रीन, जीपीएस प्रणाली सह फोम बेस आग प्रतिबंधक प्रणाली देखील बसविण्यात येणार आहे.

या उपकरणामुळे महिलांना सुरक्षितरीत्या प्रवास करता येणे शक्य होणार असून, चालकाला गाडी चालवणे अधिक सोपे होणार आहे. तसेच त्याने मद्यपान केले असले किंवा त्याला झोप येत असली तरीही सायरनद्वारे लगेच कळणार असल्याने प्रवाशांना सुरक्षितरीत्या प्रवास करता येणे शक्य होणार असल्याचे उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी सांगितले. परिवहन मंत्री श्री. सरनाईक यांनी सातत्याने केलेल्या प्रयत्नांमुळे ही प्रणाली बसविण्यात येत आहे. त्यांनी भविष्यातील बदलांचा विचार करून एसटीमध्ये अमुलाग्र बदल करण्याचा ध्यास घेतला आहे, असे कौतुकोद्गार उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी काढले.

# सर्प दंश झालेल्या मुलाचा उपचाराअभावी मृत्यू

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



शहापूर : शहापूर तालुक्यातील पेंढरघोळ येथे प्रेम लहानू सदगीर (वय 14) हा त्याच्या मित्रांसोबत क्रिकेट खेळत असताना सर्पदंश होऊन त्याचा उपचाराअभावी मृत्यू झाल्याची दुर्देवी घटना घडली आहे. शहापूर तालुक्यातील पेंढरघोळ येथे प्रेम लहानू सदगीर (वय 14) हा त्याच्या मित्रांसोबत क्रिकेट खेळत असताना बॉल आणण्यासाठी गेला असता त्याला सर्पदंश झाला. त्यानंतर तात्काळ प्रेमला शहापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, रुग्णालयात तज्ज्ञ डॉक्टर अनुपस्थित असल्याने उपचाराऐवजी केवळ रक्त तपासणी करण्यात आली. तब्बल एक तास कोणतेही औषधोपचार न करता प्रेमला बेडवर वेदनेने तडफडत होता. प्रेम आणि त्याचे पालक रुग्णालयात कार्यरत असलेल्या डॉक्टर आणि नर्स यांना वारंवार विनवण्या करत होते. "मुलाला त्रास होतो आहे, कृपया उपचार करा" अशी आर्त विनवणी करत असतानाही कुणीही प्रतिसाद दिला नाही. अखेर प्रेमच्या तोंडातून लाळ येऊ लागल्यावर आणि स्थिती गंभीर होत गेल्यावर डॉक्टरांनी धाव घेतली. त्या क्षणी रुग्णालय प्रशासनाने त्याला ठाणे येथे हलवण्याचा निर्णय घेतला. परंतु वाटेतच प्रेमचा मृत्यू झाला.

**आई-वडिलांच्या आक्रोशाने परिसर हेलावला**

प्रेमच्या आई-वडिलांनी डॉक्टर व नर्स यांना वारंवार विनवण्या करूनही त्यांच्याकडे कोणीही लक्ष दिले नाही. मुलगा त्यांच्या डोळ्यासमोर जीव सोडताना ते काहीच करू शकले नाहीत. एकुलता एक मुलगा गमावल्याने त्यांच्या दुखाला पार उरला नाही.

**आरोग्य व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह** : शहापूर तालुक्यातील आरोग्य व्यवस्था दिवसेंदिवस ढासळत चालली आहे. उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालये, आणि प्राथमिक आरोग्य केंद्रे असूनही तज्ज्ञ डॉक्टर, आवश्यक औषधे आणि उपचार सुविधा वेळेवर उपलब्ध नसल्यामुळे उपचाराअभावी रुग्ण दगावण्याच्या घटना वारंवार घडत आहेत. तालुका जंगल आणि डोंगराळ भागाने व्यापलेला असून येथे सर्पदंशाच्या घटना सामान्य आहेत. तरीही वेळेवर उपचार न मिळाल्यामुळे शेतकरी आणि शाळकरी विद्यार्थ्यांचे बळी जात आहेत. स्थानिक आमदार आणि खासदार आरोग्य व्यवस्थेकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. मोठ्या रुग्णालयांची इमारत असूनही तज्ज्ञ डॉक्टरांची अनुपस्थिती ही गरीब जनतेसाठी मृत्यूचे कारण ठरत आहे.

## थोडक्यात महत्वाचे

# भिवंडीत नशेसाठी औषध विक्रीचा प्रकार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : डॉक्टरांची अथवा शासनाची कुठल्याही प्रकारची परवानगी नसताना नशेसाठी वापरल्या जाणाऱ्या औषधांच्या विक्रीचा प्रकार भिवंडी गुन्हे शाखेने उघड केला आहे. या प्रकरणात जैतनपुरा परिसरात राहणारा कासम शेखला (५२) अटक करण्यात आली आहे. झोप, गुंगी तसेच नशेसाठी वापरल्या जाणाऱ्या औषधांचा बेकायदा साठा कासमने केल्याची माहिती गुन्हे शाखा घटक - २ च्या पोलिस पथकाला मिळाली होती. त्या अनुषंगाने पथकाने २६ मे रोजी रामेश्वर मंदिराच्या समोरील मोकळ्या मैदानात कासमला ताब्यात घेतले होते. त्याच्याकडे नशेसाठी वापरल्या जाणाऱ्या २७ हजारांच्या विविध औषधांच्या बाटल्या आढळून आल्या. त्याच्याकडे ही औषधे बाळगण्याचा कुठल्याही प्रकारचा परवाना नसल्याचे तपासात उघड झाले आहे. त्यामुळे पोलिसांनी त्याच्याकडून ९९ हजार २०० रुपयांची रोख रक्कम, २ मोबाईल फोन, एक दुचाकीसह नशेसाठी वापरल्या जाणाऱ्या १२० बाटल्या जप्त केल्या. याप्रकरणी शहर पोलिस ठाण्यात एनडीपीएस कायदा कलम ८ (क), २२ (ब) सह औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० चे कलम १८ (क), १८ (अ) शिक्षा कलम २७ (ब) व २७(ड) प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

# बेकायदा बांधकामांमुळे दिवा पोलिस ठाणे रखडले

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : बेकायदा बांधकामांचे शहर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दिवा शहरात वाढत्या गुन्हेगारीमुळे नवे पोलिस ठाणे काळाची गरज आहे. याच अनुषंगाने ठाणे शहर पोलिसांनी पोलिस महासंचालक कार्यालयाकडे पाठवलेल्या सहा नव्या पोलिस ठाण्यांच्या प्रस्तावांमध्ये दिव्याचादेखील समावेश आहे; पण बेकायदा बांधकामांमुळे पोलिस ठाणे उभारणीसाठी जागाच नसल्याने प्रशासनासमोर नवा प्रश्न निर्माण झाला आहे. रेल्वेच्या नकाशावर दिवा जंक्शन अशी ओळख आहे. ठाणे महापालिकेच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या खाडीकिनारी असलेल्या दिवा शहराची लोकसंख्या सुमारे सहा ते सात लाखांच्या घरात गेली आहे. बेकायदा बांधकामांमुळे हे शहर सध्या चर्चेत आहे. या शहरातील नागरीकरणाने वाढलेली लोकसंख्या आणि गुन्हेगारी प्रमाणही वाढताना दिसत आहेत; पण लोकसंख्येच्या तुलनेत दिव्यात एक पोलिस चौकी आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे पोलिस ठाण्याची गरज लक्षात घेताना नागरिकांसह राजकीय पक्षांकडून सातत्याने नवे पोलिस ठाणे असावे, अशी मागणी होत आहे. त्यानुसार नव्या पोलिस ठाण्याच्या प्रस्तावात दिवा पोलिस ठाण्याचा समावेश शहर पोलिस दलाकडून तयार करण्यात आला आहे.

# नऊ कोटींची मालमत्ता कर माफी

## उल्हासनगर मनपा विरोधात आंदोलन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर : महापालिका निवृत्त कर्मचाऱ्यांची देणी बाकी असताना एका मोठ्या कंपनीचा ९ कोटींचा मालमत्ता कर माफ केल्याच्या निषेधार्थ समाजसेवक नरेश गायकवाड हे महापालिकेसमोर गेल्या ७ दिवसापासून उपोषण करीत आहेत. याबाबत आयुक्तांनी चौकशी करून मालमत्ता कर माफ करणाऱ्यांवर कारवाई करावी अशी त्यांची मागणी आहे. उल्हासनगर महापालिकेने एका मोठ्या कंपनीचा मालमत्ता कर माफ केल्याचा प्रकार गेल्या काही महिन्यापूर्वी गाजला होता. भाजपच्या नेत्याने यावर आक्षेप घेऊन याप्रकरणी चौकशीची मागणी करून कारवाईची मागणी केली होती.




तत्कालीन आयुक्तांनी दिले होते कारवाईचे संकेत तत्कालीन आयुक्तानी याप्रकरणी चौकशी समिती स्थापन करून अहवाला नंतर कारवाईचे संकेत दिले होते. तेव्हापासून हे प्रकरण धुळखात पडले आहे. दरम्यान समाजसेवक व शरद पवार गटाचे पदाधिकारी नरेश गायकवाड यांनी ९ कोटीची मालमत्ता कर माफी प्रकरणी कारवाईची मागणी करून त्या निधीतून महापालिका सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची थकीत देणी देण्याची मागणी केली. गायकवाड यांनी महापालिका मुख्यालया समोर गेल्या ७ दिवसांपूर्वी उपोषण सुरु केले. महापालिका आयुक्त व अधिकारी हे गायकवाड यांच्या मागणीला दाद देत नसल्याने, त्यांनी सोमवारपासून अर्धनग्न आंदोलन सुरु केले, त्यांच्या उपोषणाला महापालिका सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी पाठिंबा दिल्याचे गायकवाड यांचे म्हणणे आहे.

**गायकवाड यांच्या महापालिकेला इशारा**

महापालिका अशीच दुर्लक्ष करीत राहिल्यास अंगावरील एकएक कपडा काढून आंदोलन करण्याचे संकेत दिले. मालमत्ता कर विभागाच्या एका कर्मचाऱ्यांच्या शैक्षणिक पात्रतेबाबत त्यांनी आवाज उठवीला असून त्यांची शैक्षणिक माहिती सार्वजनिक करण्याची मागणी केली. ९ कोटी मालमत्ता कर माफी नंतर एका बँकेच्या जागेचे मालमत्ता कर माफी बाबतचेही प्रकरण गाजले होते. आयुक्तानी याबाबत दखल घेऊन संबंधित अधिकाऱ्याकडून माहिती मागितली होती. एकूणच मालमत्ता कर विभाग वादात सापडल्याचे बोलले जात आहे.

## मेट्रोच्या कामामुळे

# ठाण्याच्या वाहतुकीत बदल

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : संथ गतीने सुरू असलेल्या वडाळा-कासारवडवली मेट्रो स्थानकाच्या छताचे काम हाती घेण्यात येणार आहे. त्यामुळे माजिवडा उड्डाणपुलावरून नाशिक आणि घोडबंदर रोडकडे जाणारी वाहतूक 28 ते 31 मे या कालावधीत रात्री 10 ते पहाटे 5 या वेळेत पुलाखालील मार्गावरून वळविण्यात येणार आहे. दरम्यान, नाशिक आणि घोडबंदरकडे जाणाऱ्या मार्गावर वाहतुकीचा परिणाम होणार आहे. महामार्गावरील ज्युपिटर रुग्णालयाजवळ मेट्रो स्थानकाचे काम सुरू असून त्यावर छत उभारण्यासाठी कॉलम उभे केले जाणार आहेत. या कामादरम्यान जॅक बीम टाकून त्यावर राफ्टर उभारले जाईल. हे काम 60 टन असलेल्या क्रेनच्या सहाय्याने होणार आहे. रात्री 10 वाजता भलीमोठी क्रेन उभी करण्यात येणार आहे. पहाटे पाचपर्यंत हे काम सुरू राहणार असल्याने या पुलावरून घोडबंदर रोड व नाशिककडे जाणाऱ्या सर्वच वाहनांना बंदी घालण्यात आली असल्याची माहिती ठाणे वाहतूक शाखेच्या वतीने देण्यात आली आहे.

**हा आहे पर्यायी मार्ग** : मुंबईकडून नाशिक व घोडबंदर रोडकडे जाणारी वाहने माजिवडा उड्डाणपुलावर न जाता पुलाखालून कापूरबावडी सर्कल येथील इच्छितस्थळी जातील.

# जिल्हा परिषद निवडणुकीसाठी इच्छूकांची मोर्चेबांधणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर : मिनी मंत्रालय म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जिल्हा परिषदचे गट आणि पंचायत समितीच्या निवडणुका पुढील दोन-तीन जाहीर होण्याची शक्यता आहे. या निवडणुकांमध्ये प्रमुख दावेदारांसह इच्छुकांनी लग्नसोहळ्यातून गावागावात संपर्क मोहीम राबवली आहे. राज्यात भाजप सोबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र असले तरी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत तिन्ही पक्ष वेगवेगळे लढण्याची शक्यता आहे. भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार), शिवसेना (एकनाथ शिंदे) या तिन्ही पक्षांमध्ये गावागावातील विविध पक्ष तसेच संघटनांमधील कार्यकर्त्यांचे इनकमिंग मोठ्या संख्येने वाढले आहे. या तिन्ही पक्षांची स्थानिक स्वराज्य संस्थांवरील निवडणुकांवर मजबूत पकड आहे. महाविकास आघाडीच्या राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार), शिवसेना (उद्धव ठाकरे) आणि अखिल भारतीय काँग्रेसमधील काही दावेदारांचे भवितव्य जिल्हा परिषदेच्या निवडणुकीवरच अवलंबून आहे.









# गीतासार



**अध्याय ११**
**विश्वरूपदर्शनयोगः**

नाहं वेदैर्न तपसा न दानेन न चेज्यया । शक्य एवंविधो द्रष्टुं दृष्टवानसि मां यथा ॥ ११-५३ ॥

तू जसे मला पाहिलेस, तशा माझ्या चतुर्भुज रूपाचे दर्शन वेदांनी, तपाने, दानाने आणि यज्ञानेही मिळणे शक्य नाही. ॥ ११-५३ ॥

भक्त्या त्वनन्यया शक्य अहमेवंविधोऽर्जुन । ज्ञातुं द्रष्टुं च तत्त्वेन प्रवेष्टुं च परन्तप ॥ ११-५४ ॥

परंतु हे परंतपा (अर्थात शत्रुतापना) अर्जुना, अनन्य भक्तीने या प्रकारच्या चतुर्भुजरूपधारी मला प्रत्यक्ष पाहणे, तत्त्वतः जाणणे तसेच (माझ्यात) प्रवेश करणे अर्थात (माझ्याशी) एकरूप होणेही शक्य आहे. ॥ ११-५४ ॥

मत्कर्मकृन्मत्परमो मद्भक्तः सङ्गवर्जितः । निर्वैरः सर्वभूतेषु यः स मामेति पाण्डव ॥ ११-५५ ॥

हे पांडवा (अर्थात पांडुपुत्र अर्जुना), जो पुरुष केवळ माझ्याचसाठी सर्व कर्तव्यकर्मे करणारा, मलाच परम आश्रय मानणारा, माझा भक्त आसक्तिरहित असतो आणि सर्व भूतमात्राविषयी निर्वैर असतो, तो अनन्य भक्त मलाच प्राप्त होतो. ॥ ११-५५ ॥

ॐ तत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे विश्वरूपदर्शनयोगो नामैकादशोऽध्यायः ॥ ११ ॥

ॐ हे परमसत्य आहे. याप्रमाणे श्रीमद्भगवद्गीतारूपी उपनिषद तथा ब्रह्मविद्या आणि योगशास्त्राविषयी श्रीकृष्ण आणि अर्जुन यांच्या संवादातील विश्वरूपदर्शनयोगः नावाचा हा अकरावा अध्याय समाप्त झाला. ॥ ११ ॥

## रेसिपी

### बटाट्याची रस्सा भाजी

साहित्य : 4 मोठे बटाटे
2 मध्यम आकाराचे कांदे
1.5 मोठा चमचा लाल तिखट मसाला
1 छोटा चमचा मोहरी
1 छोटा चमचा हळद
1 मोठा चमचा आले लसूण पेस्ट
2 मोठे टोमॅटो
2 मोठे चमचे शेंगदाण्याचे कूट
चवीनुसार मीठ
थोडीशी कोथिंबीर

कृती : प्रथम 4 मोठे बटाटे घेतले. आणि त्याची साले काढून स्वच्छ पाण्याने धुऊन घेतले. आणि चिरून घेतले.
मग 2 मोठे कांदे घेऊन ते सुद्धा बारीक चिरून घेतले.
नंतर एका कढईत तेल घालून ते चांगले गरम झाल्यावर त्यात 1 चमचा मोहरी घालून ती चांगली तडतडल्यावर त्यात बारीक चिरलेले 2 कांदे घालून तो चांगला परतून घेतला.
मग त्यात 2 मोठे चमचे लाल तिखट मसाला,1 छोटा चमचा हळद, 1 चमचा आले लसूण पेस्ट घालून ते चांगले मिक्स करून घेतले. आणि त्यावर चिरून घेतलेले बटाटे घालून ते चांगले परतून घेतले.
नंतर त्यात बारीक चिरलेले 2 टोमॅटो, 2 चमचे शेंगदाण्याचे कूट, चवीनुसार मीठ घालून सर्व साहित्य चांगले मिक्स करून घेतले. आणि त्यात 2 कप पाणी घालून ते चांगले शिजवून घेतले.
तांदळाच्या भाकरीसाठी 2 कप तांदळाचे पीठ घेऊन, 2 कप उकळते पाणी घालून ते पीठ चांगले मळून घेतले.
आणि मळलेल्या पिठाचे गोळे करून, त्याची भाकरी थापून घेतली. मग तवा गरम करून त्यावर थोडे तेल लावून, त्यावर थापून घेतलेली भाकरी घालून, वरून भाकरीला पाणी लावून भाकरी दोन्ही बाजूने चांगली भाजून घेतली.
आता सर्व्ह करण्यासाठी तयार आहे आपली गरमा गरम बटाट्याची रस्सा भाजी आणि तांदळाच्या भाकऱ्या. या भाकऱ्या बटाट्याच्या रस्सा बरोबर खूप सुंदर लागते.

## केडीएमसीच्या ‘अ’ व ‘क’ प्रभागातील
# अनधिकृत बांधकामांवर तोडक कारवाई

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवली महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांच्या निर्देशानुसार, उपायुक्त अवधूत तावडे यांच्या मार्गदर्शनाखाली अ प्रभागाचे सहा.आयुक्त प्रमोद पाटील यांनी टिटवाळा ,कल्याण वळण मार्ग येथील काळू नदीशेजारील 2 रुमचे अनाधिकृत बांधकाम , 10 अनाधिकृत जोत्यावर धडक तोडक कारवाई करीत संदर्भीत अनाधिकृत बांधकाम बुधवारी जमीनदोस्त करण्यात आले.



हि कारवाई महापालिका पोलीस अधिकारी व कर्मचारी, अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाचे कर्मचारी यांच्या मदतीने आणि 1 जेसीबी व 10 मजूर यांच्या सहाय्याने करण्यात आली.

तसेच क प्रभागाचे सहा.आयुक्त धनंजय थोरात यांनी कल्याण (पश्चिम) पाठारे नर्सरी, डॉ.आंबेडकर रोड येथील बांधकामधारक तनजीप कांबळे चालू असलेल्या एकुण 10 रुमच्या लोडबेरींग बांधकामावर पाडकाम कारवाई केली. हि कारवाई बाजारपेठ पोलीस स्थानकामधील पोलीस अधिकारी, कर्मचारी, महापालिका पोलीस अधिकारी व कर्मचारी, अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाचे कर्मचारी यांच्या मदतीने आणि 1 जेसीबी च्या सहाय्याने करण्यात आली.

## उल्हासनगर महापालिकेची
# पर्यावरण दिनानिमित्त विशेष मोहिम

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर : पर्यावरण दिनानिमित्त उल्हासनगर महापालिकेच्या वतीने शहरातील हरित क्षेत्र वाढविण्यासाठी विशेष मोहिम राबवण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत सार्वजनिक ठिकाणी, रस्त्यांच्या कडेला, उद्याने आणि शाळा परिसरात झाडे लावण्याचा महापालिकेचा मानस असून यासाठी झाडांची मोठ्या प्रमाणावर आवश्यकता आहे.



महापालिकेला विविध प्रकारच्या सावलीदार, फलदार व फुलझाडांची गरज असून पर्यावरणप्रेमी नागरिक, संस्था, उद्योजक, व्यापारी आणि स्वयंसेवी संघटनांनी झाडे दान करून या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

ही झाडे महापालिकेच्या मार्गदर्शनाखाली योग्य ठिकाणी लावण्यात येतील आणि त्यांचे संगोपन देखील महापालिकेच्या वतीने करण्यात येईल. दान करताना झाडे किमान ३ ते ५ फुट उंचीची असावीत, तसेच त्यांची प्रजाती स्थानिक हवामानास अनुकूल असावी, यावर भर दिला जाणार आहे. झाडे दान करू इच्छिणाऱ्यांनी विभाग प्रमुख दत्तात्रय जाधव यांना 7678028244 या क्रमांकावर संपर्क करावा, अशी माहिती पालिकेच्या जनसंपर्क विभागाकडून देण्यात आली

नागरिकांचे हे छोटेसे योगदान हरित आणि प्रदूषणमुक्त शहराच्या दिशेने वाटचाल करणारे मोठे पाऊल ठरणार आहे.

## शेतकऱ्यांवर अस्मानी संकट
# उन्हाळी भातशेतीसह भाजीपाला भुईसपाट

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर : मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासून अवकाळी पावसाला सुरुवात झाली असून या सतत पडत असलेल्या अवकाळी पावसामुळे उन्हाळी भातशेती तसेच भाजीपाला शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.दरम्यान नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतीचे तात्काळ पंचनामे करुन त्यांना आर्थिक मदत जाहीर करावी अशी मागणी भाजपच्या आदिवासी आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष अशोक इरनक यांनी शहापूर तहसीलदार परमेश्वर कासुले यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.



चेरपोली,आवरे,कांबरे,कवडास, तुते, अर्जुनली,पिंपळपाडा, काळेपाडा, सरलांबे, साजिवली, सावरशेत, खुटाडी या गावांमधील शेतक-यांची शेतजमीन ओलिताखाली आहे. त्यामुळे परिसरातील शेतकरी भातसा धरणातून सोडण्यात येणाऱ्या कालव्याच्या साह्याने पाणीपुरवठा करून अनेक वर्षांपासून उन्हाळी भातशेती करीत आहेत.दरम्यान भातसा धरण विभागाला विनंती करूनही कालव्यात पाणी सोडण्यात न आल्याने भातशेती व भाजीपाला शेतीचे नुकसान झाले आहे.तथापि भातपीक उत्तम प्रकारे आले असून कापणीसाठी तयार झाले आहे. परंतु गेली वीस दिवसांपासून सतत पडत असलेल्या अवकाळी पावसामुळे भात कापणीसाठी विलंब होत आहे. यामुळे तयार झालेले उभे पीक सततच्या पावसामुळे आडवे झाल्याने बळीराजाच्या डोळ्यात पाणी आले आहे.

**अस्मानीसह सुलतानी संकट**

ईडा पीडा टळू दे, बळीचे राज्य येऊ दे! असे बोलत शहापूर तालुक्यातील शेतकरी कोणतेही संकट आले तरी त्याला न डगमगता भातशेती व भाजीपाला शेती करीत असतो. यामध्ये बियाणे,खते, औषधे यांच्या वाढलेल्या किंमती, मशागतीची कामे,मजूरांची कमतरता, यावर मात करीत बळीराजा मोठ्या हिमतीने भात शेती करतो.परंतु, अंतिम टप्प्यात तयार आलेली भात शेती निसर्गाच्या एका कोपामुळे उध्वस्त होताना बळीराजा फक्त उघड्या डोळयांनी पाहत आहे.त्यामुळे शासनाने शेतकऱ्यांवर पडलेल्या संकटाची दखल घेऊन त्यांना मदत करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

# काटई पुलाच्या कामासाठी युद्धपातळीवर प्रयत्न

## ९५ टक्के काम पूर्ण, जून अखेरीस सुरु होणार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : कल्याण शिळ मार्गावरील पलावा येथील वाहतूक कोंडी फोडण्यात महत्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या काटई उड्डाणपुलाचे काम ९५ टक्के पूर्ण झाले असून पावसामुळे या कामात व्यत्यय येत आहे. मात्र तरीही या पुलाचे काम लवकरात लवकर पूर्ण करत हा पूल जून अखेर पर्यंत वाहतुकीसाठी खुले करण्यासाठी युद्ध पातळीवर प्रयत्न सुरु असल्याचे कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश मोरे यांनी सांगितले.



**बुधवारी सकाळी आमदार मोरे यांनी पुलाच्या कामाची पाहणी करत रस्ते विकास महामंडळाच्या अधिकाऱ्याकडून कामाचा आढावा घेतला.**

बुधवारी सकाळी आमदार मोरे यांनी पुलाच्या कामाची पाहणी करत रस्ते विकास महामंडळाच्या अधिकाऱ्याकडून कामाचा आढावा घेतला. याबाबत आमदार मोरे म्हणाले, आपण १ जून रोजी नागरिकांना पूल खुले करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र पावसामुळे कामात व्यत्यय आल्याने काम थोडेसे लांबले आहे. काल आणि आज २८ मे रोजी या पुलाच्या कामाची पाहणी केली असून, पुलाचे काम कोणत्याही परिस्थितीत लवकरात लवकर पूर्ण करून हे पूल वाहतुकीसाठी जून अखेर पर्यंत सुरु करण्याचे आश्वासन नागरिकांना देत असल्याचे सांगितले. यावेळी डोंबिवली शिवसेना शहर सचिव तथा विधानसभा क्षेत्रप्रमुख संतोष चव्हाण, स्वीय सहाय्यक सतीश मोडक, युवासेना पदाधिकारी रोहित म्हात्रे तसेच रस्ते विकास महामंडळाचे अधिकारी उपस्थित होते.

# पावसाळी पर्यटन करताना काळजी घ्या !



मार्च महिन्याच्या मध्यापासूनच सुरु झालेला तीव्र उन्हाळा कधी एकदा संपून वर्षाऋतू सुरु होतोय याची प्रतीक्षा सर्वांनाच होती. यापूर्वी कधीही न अनुभवलेला उकाडा यंदा अनेकांनी सहन केला. त्यामुळे पावसाळा लवकरात लवकर सुरु व्हावा अशी सर्वांचीच अगदी मनापासून इच्छा होती. इंद्रदेवानेही सर्वांच्याच इच्छेचा मान ठेवत प्रतिवर्षीच्या ठरलेल्या नियोजनात बदल केला आणि वर्षाऋतूला १३ दिवस आधीच महाराष्ट्रात पाठवले. शेतकरी, व्यावसायिक, फेरीवाले, मुंबईतील झोपडपट्यांत वसणारे नागरिक यांची पावसापूर्वी करावयाची सिद्धता तशीच राहिली असली तरी यंदाचा जीवघेणा उकाडा सहन केल्यानंतर मिळालेल्या पावसाच्या गारव्याने राज्यातील सामान्य माणूस मात्र सुखावला आहे. वर्षाऋतूच्या आगमनाचा आनंद द्विगुणित करण्यासाठी तरुणवर्ग दरवर्षी पावसाच्या आरंभी पावसाळी सहलीचे आयोजन करत असतो. राज्यातील अशी काही पर्यटनस्थळे आहेत ज्या ठिकाणी पावसाळ्यात आनंद लुटण्यासाठी मोठ्या संख्येने पर्यटक येतात. धबधबे, नद्या, तळी किंवा समुद्रकिनारे लाभलेली ही स्थळे पावसाळ्यात ओसंडून वाहू लागतात. ही ठिकाणे जशी पर्यटकांना मनमुराद आनंद देतात तशीच याठिकाणी योग्य ती काळजी न घेतल्यास ती पर्यटकांचा जीव घेण्यासही कारणीभूत ठरू ठरतात. अशा पावसाळी पर्यटनस्थळांच्या ठिकाणी दरवर्षी कुठेनाकुठे अपघात होऊन पर्यटक पाण्यात बुडाल्याच्या किंवा वाहून गेल्याच्या बातम्या वाचनात येतात. पाण्याच्या ठिकाणी उत्साहाच्या भरात पर्यटक स्वतःला झोकून देतात. बऱ्याचदा पाण्याच्या खोलीचा आणि वेगाचा अंदाज न आल्यामुळे अपघात घडतात. तर काही अतिउत्साही तरुण तरुणी सेल्फीच्या नादात अपघातांना बळी पडतात. मद्यपान करून पाण्यात उतरल्याने पट्टीचे पोहणारे सुद्धा पाण्याच्या वेगासमोर असमर्थ ठरतात. पाण्याच्या ठिकाणी जिथे पर्यटकांची ये जा असते अशा ठिकाणी जीवन रक्षकांची सुद्धा व्यवस्था असते; मात्र पावसाळ्यात येणाऱ्या पर्यटकांची संख्या पुष्कळ असल्यामुळे हे जीवन रक्षक त्या तुलनेत खूपच कमी पडतात. मौजमजेसाठी पाण्यात डुंबायला अवश्य जावे; मात्र ही मौज आपल्या जीवावर उलटणार नाही याची काळजी पर्यटकांनीच घेणे आवश्यक आहे. पाण्याच्या वेगाशी आणि खोलीशी उगाचच स्पर्धा करू नये, आपल्यासोबतच्या नातेवाईकांना आणि मित्रमैत्रिणींनाही याविषयी सक्त ताकीद द्यावी. लहान मुलांची विशेष काळजी घ्यावी. मद्यपान करून पाण्यात मुळीच जाऊ नये. आपण सहलीसाठी जातो तेव्हा घरी आपली कुणीतरी वाट पाहत असते. आपण केलेली मौजमजा त्यांना ऐकून अनुभवायची असते. अशा आपल्या जिव्हाळ्याच्या व्यक्तीला धक्का बसणारी बातमी मिळणार नाही याची काळजी घेणे आपले कर्तव्यच नव्हे का ?

- जगन घाणेकर

# ३१ मे पर्यंत शेतकऱ्यांनी फार्मर आयडी तयार करुन घ्यावा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : शासनाच्या विविध योजनांचा लाभ शेतकऱ्यापर्यंत जलद गतीने व परिणामकारकरित्या पोहोचविता यावा याकरिता कृषी क्षेत्रासाठी सर्वसमावेशक डिजिटल पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी ॲग्रीस्टॅक (डिजिटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चर फॉर एग्रीकल्चर) योजना राज्यात राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत सर्व शेतकऱ्यांनी आपले आधार कार्ड, पॅन कार्ड, 7/12, 8-अ खाते उतारा, बँक खात्याचा तपशील तसेच आधार संलग्न मोबाईल क्रमांक घेऊन दि.31 मे 2025 पूर्वी आपला शेतकरी ओळख क्रमांक जवळच्या आपले सरकार सेवा केंद्र /C.S.C. सेंटर येथे जाऊन तयार करून घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी वंदना शिंदे यांनी केले आहे.

ॲग्रीस्टॅक हे कृषी क्षेत्रात डेटा आणि डिजिटल सेवा वापरून शासनाच्या विविध योजनांचा लाभ पात्र शेतकऱ्यांपर्यंत जलद गतीने व परिणामकारकरीत्या पोहोचण्यासाठी स्थापित केले जाणारे डिजिटल फाउंडेशन आहे.कृषी क्षेत्रासाठी सर्व समावेशक डिजिटल पायाभूत सुविधा निर्माण करणे हा ॲग्रीस्टॅक उपक्रमाचा उद्देश आहे. या प्रकल्पामुळे माहिती आधारित योग्य निर्णय घेणे, गरजू शेतकऱ्यांना योग्य वेळी सेवा प्रदान करणे, कृषी उपक्रमांची कार्यक्षमता सुधारणे शक्य होईल. विविध शेतकरी आणि कृषी-केंद्रित योजनांची आखणी करणे व अंमलबजावणी करणे सुलभ होईल. आज अखेर पीएम किसान योजनेंतर्गत नोंदणी केलेल्या 1 लाख 85 हजार 963 खातेदारांपैकी 1 लाख 19 लाख 615 शेतकऱ्यांनी ॲग्रीस्टॅक योजनेंतर्गत नोंदणी केली आहे.

जीवनदीप महाविद्यालय गोवेली, कल्याण
मुंबई विद्यापीठाशी संलग्न, नॅक मूल्यांकन प्राप्त
प्रवेश सुरू (२०२५•२६)
बारावीनंतर पत्रकारितेत करिअर करण्याची सुवर्णसंधी
-बीएएमएमसी-
(बॅचलर ऑफ मल्टीमीडिया अँड मास कम्युनिकेशन)
-पात्रता-
कोणत्या शाखेतून बारावी उत्तीर्ण
- करिअर व्यवसाय व नोकरीची संधी -
टीव्ही चॅनेल्स, वृत्तपत्र, मॅक्झिन, रेडिओ, वेब मीडिया, जनसंपर्क, जाहिरात, चित्रपट निर्मिती, डिजिटल मीडिया या क्षेत्रांमध्ये संधी .
- प्रवेशासाठी संपर्क -
९४२१०५९३९६
goveli_jssp@rediffmail.com
www.jeevandeepcollegegoveli.in
MASS MEDIA

जीवनदीप शैक्षणिक संस्था, पोई संचलित
जीवनदीप महाविद्यालय, गोवेली
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गोवेली
मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्न, नॅक मुल्यांकन (B- Grade) प्राप्त
११ वी व १२ वी
कला, वाणिज्य, विज्ञान (IT / CS)
UNDER GRADUATION: B.Sc Data Science, B.Sc IT, B.Sc Chemistry Maths, BMS, BAF, B.Com, BAMMC, B.A.
POST GRADUATION: M.Sc IT, M.Sc Chemistry, M.Com Advanced Accountancy, MAMMC, M.A. Marathi, M.A. Economics, M.A. History, M.A. Sociology, M.A. Geography
Admission Open 2025-2026
आपलं कॉलेज हक्काचं कॉलेज
आजच आपला प्रवेश निश्चित करा!
7775851123, 8108559566
9619188558

## आजचे राशिभविष्य



**मेष** -या काळात तुम्ही धार्मिक कार्यात सहभागी व्हाल. तसेच, व्यवसायाच्या दृष्टीने तुम्हाला चांगला लाभ मिळेल. तसेच, कुटुंबात आनंदी वातावरण राहील.

**वृषभ** - तुम्हाला पैशांची गुंतवणूक करायची असेल तर त्यासाठी उद्याचा दिवस शुभ असणार आहे. वडिलोपार्जित संपत्तीचा तुम्ही लाभ घ्याल.

**मिथुन** - समाजात तुम्हाला मान-सन्मान मिळेल. नोकरीत प्रमोशन मिळण्याची शक्यता आहे. पार्टनरबरोबर तुमचा संवाद चांगला राहील.

**कर्क** - देवी लक्ष्मीचा तुमच्यावर आशीर्वाद असणार आहे. कामाच्या ठिकाणी सहकाऱ्यांबरोबर चांगला संवाद साधाल. तुमचं वैवाहिक जीवन सुखी राहील.

**'सिंह** - या काळात तुमची चांगली प्रगती दिसून येईल. तसेच, जे लोक संशोधन क्षेत्रात आहेत त्यांचा चांगला विकास होईल. तुमच्या कुटुंबात आनंदी वातावरण राहील. मित्रांबरोबर चांगला वेळ घालवाल.

**कन्या** - मानसिक आणि शारीरिक आरोग्याला प्राधान्य द्या - नियमित दिनचर्या आणि जागरूक जीवनशैली संतुलन राखेल.

**तूळ** - तुमच्या कारकिर्दीत, तुमची अनुकूलता आणि टीमवर्कची भावना तुम्हाला अडचणींवर मात करण्यास आणि तुमची प्रशंसा मिळविण्यास मदत करू शकते.

**वृश्चिक** -अचानक केलेल्या प्रवासाच्या योजना तुम्हाला नवीन ताजेपणा आणि दृष्टिकोन देऊ शकतात. आत्मनिरीक्षण तुम्हाला वाढण्यास मदत करेल.

**धनु** -आरोग्य राखण्यासाठी, संतुलित दिनचर्येकडे लक्ष द्या आणि तुमच्या शरीराचे ऐका आणि जास्त थकवा टाळा. व्यावहारिक विचारसरणी दीर्घकालीन प्रगतीचा मार्ग मोकळा करेल.

**मकर** -व्यावसायिकदृष्ट्या, तुमचे संवाद कौशल्य चमकेल, ज्यामुळे महत्त्वाचे निर्णय घेण्यासाठी हा एक चांगला काळ बनेल. संवादामुळे संबंध मजबूत होतील.

**कुंभ** - आरोग्याच्या बाबतीत, नियमित निरोगीपणाचा दिनक्रम ठेवा आणि तुमच्या शरीराचे संकेत काळजीपूर्वक ऐका. सहकार्यासाठी खुले रहा तुमच्या दृष्टिकोनावर विश्वास ठेवा.

**मीन** - भावनिकदृष्ट्या, आत्मनिरीक्षण नवीन समज आणि प्रगतीकडे नेईल आणि अचानक झालेली सहल ताजेतवाने दृष्टिकोन प्रदान करू शकते.

news.thanejeevandeep@gmail.com
दैनिक ठाणे जीवनदीप
WhatsApp Channels
महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर
मुख्य संपादक : रवींद्र नारायण घोडविंदे
कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम. डी.)
9619188558 / 9082664781
www.jeevandeepvarta.com/
आपलं हक्काचं दैनिक, दररोज वाचा.




# नवी मुंबई मनपाचे आपात्कालीन दल सज्ज

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

नवी मुंबई : नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात आपत्ती निवारणासाठी विभागवार यंत्रणा असून यामध्ये महानगरपालिकेचे अग्निशमन दल महत्वाची भूमिका बजावते. त्या कार्यवाहीत अधिक सक्षमता येण्याच्या दृष्टीने राष्ट्रीय व राज्य आपत्ती प्रतिसाद पथक तसेच ठाणे महानगरपालिकेचे आपत्ती प्रतिसाद पथक (TDRF) या धर्तीवर नवी मुंबई महानगरपालिकेने आपत्कालीन प्रतिसाद दल (DRF - Disaster Response Force) स्थापन केले आहे. महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी याबाबतचे आदेश जारी केले असून नवी मुंबई महानगरपालिका अग्निशमन विभागातील प्रशिक्षित अधिकारी व कर्मचारी तसेच नागरी संरक्षण दलामधील अधिकारी यांचा समावेश असणारे हे स्वतंत्र आपत्कालीन प्रतिसाद दल (DRF) यापुढील काळात नवी मुंबईतील आपत्ती निवारणासाठी सज्ज असणार आहे.

नवी मुंबई शहराच्या भौगोलिक व्याप्तीमध्ये डोंगरावरील वस्ती, खाडी किनारा, तलावे, जुनी बांधकामे, शहरातून जाणारे राज्य व राष्ट्रीय महामार्ग इत्यादी बाबींचा विचार करता नवी मुंबई शहरामध्ये कोणतीही आपत्ती उदा. अतिवृष्टीमुळे रस्त्यावर पाणी तुंबणे, वृक्ष व वृक्षांच्या फांद्या पडणे, इमारत ढासळणे, निवासी व व्यापारी मालमत्तांमध्ये पाणी शिरणे, दरड कोसळणे, भूस्खलन (Land Slide) अशा घटना यापूर्वी घडलेल्या आहेत. अशाप्रकारे नवी मुंबई शहरामध्ये कोणतीही नैसर्गिक अथवा मानव निर्मित आपत्ती घडल्यास अग्निशमन दलास पाचारण केले जाते. ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन अग्निशमन विभागातील प्रशिक्षित अधिकारी, कर्मचारी आणि नागरी संरक्षण दलामधील अधिकारी यांचा समावेश असणारे स्वतंत्र आपत्कालीन प्रतिसाद दल (DRF) स्थापना करण्यात आलेले आहे.

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्राकरिता आपत्कालीन परिस्थितीमध्ये तात्काळ प्रतिसाद देण्यासाठी परिमंडळ- १ व परिमंडळ-२ अंतर्गत परिमंडळनिहाय आपत्कालीन प्रतिसाद दल (DRF) स्थापित करण्यात आलेले असून हे दल उपआयुक्त (आपत्ती व्यवस्थापन) यांचे देखरेख व नियंत्रणाखाली कार्यरत राहतील. सहा.अग्निशमन केंद्र अधिकारी श्री.प्रेमानंद ठाकूर हे परिमंडळ 1 आपत्कालीन प्रतिसाद दलाचे तसेच सहा.अग्निशमन केंद्र अधिकारी श्री. पदाजी निरगुडे हे परिमंडळ 2 आपत्कालीन प्रतिसाद दलाचे नियंत्रण अधिकारी असणार असून त्यांच्या नियंत्रणाखाली विभागीय क्षेत्ररक्षक, अग्निशमन प्रणेता, अग्निशामक अशी 11 जणांचा प्रशिक्षित समुह मदतकार्यासाठी दक्षतेने कार्यरत असणार आहे. हे आपत्कालीन प्रतिसाद दल (DRF) नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयात 24 X 7 कार्यरत असणार आहे. आपत्ती किंवा दुर्घटनेचे स्वरुप मोठे असल्यास दलामधील सर्व अधिकारी व कर्मचारी एकत्रित काम करतील. नियंत्रण कक्षामधून आपत्तीबाबत माहिती मिळाल्यानंतर दलामार्फत त्या ठिकाणी आपत्ती निवारणासाठीच्या तात्काळ उपाययोजना करण्यात येतील. दलाकडे आवश्यक वाहने व साहित्य पुरेशा प्रमाणात उपलब्ध ठेवण्यात येईल.या अनुषंगाने नमुंमपा अग्निशमन दलाचे मुख्य अग्निशमन अधिकारी यांचेमार्फत आपत्कालीन प्रतिसाद दलांमधील अधिकारी व कर्मचारी यांना आवश्यक वाहने तसेच लाईफ जॅकेट्स, कटींग टूल्स (स्प्रेडर कटर कॉम्बी टूल्स इत्यादी), काँक्रीट कटर, पॉवर हॅमर, लेंडर, फायर एक्स्टिंग्युशर अशी तसेच इतर आवश्यक असणारी साधन सामग्री उपलब्ध करुन देण्यात येत आहे. या आपत्कालीन प्रतिसाद दलामुळे (DRF) नवी मुंबई महानगरपालिकेची आपत्ती निवारण यंत्रणा अधिक सक्षम होणार असून कोणत्याही प्रकारच्या दुर्घटनेत तात्काळ मदतकार्य सुरू करणे शक्य होणार आहे. त्याचप्रमाणे या दलामध्ये अग्निशमन दलातील प्रशिक्षित अधिकारी, कर्मचारी असल्याने तसेच त्यांना नागरी संरक्षण दलाची साथ असल्याने मदतकार्य सक्षमतेने होणार आहे. त्याचप्रमाणे परिमंडळनिहाय दोन स्वतंत्र समुह कार्यान्वित करण्यात आल्याने जलद मदतकार्य करणे शक्य होणार आहे. तरी नागरिकांनी कोणत्याही प्रकारच्या मदतकार्यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेच्या मध्यवर्ती नियंत्रण कक्षाशी 27567060/7061 या दूरध्वनी क्रमांकावर अथवा 1800222309/1800222310 या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या वतीने करण्यात येत आहे.

# कल्याण डोंबिवली महानगरपालिका कल्याण

## जन्म-मृत्यू नोंदणी कल्याण विभाग

शंकरराव चौक, कल्याण (प.) जि. ठाणे, पिन ४२१३०१

## जाहिर नोटिस

संदर्भ : १. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभागाकडील शासन निर्णय क्रमांक जमृनों: २५२५/ (ई.ऑ.९९११८१)/प्र.क्र.२२/कु.क.दि.१२/०३/२०२५.
२. मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय ठाणे यांचा दिनांक १६/०४/२०२५ चा आदेश.

जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम, १९६९ व सुधारणा अधिनियम, २०२३ अन्वये "विलंबाने करावयाच्या जन्म मृत्यु नोंदिबाबतची कार्यपद्धती निश्चित" करण्यात आली आहे. तसेच, शासन पत्र दि.२१/०१/२०२५ नुसार देण्यात आलेला स्थगिती आदेश रद्द करण्यात आला असून, ठाणे जिल्हा महसुल हद्दीत दिनांक ११/०८/२०२३ ते २१/०१/२०२५ या कालावधीत "जन्म मृत्यु प्रमाणपत्रांपैकी जे प्रमाणपत्र तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी या पदापेक्षा कमी दर्जाच्या अधिकाऱ्यांनी निर्गमित केलेले आहेत ते प्रमाणपत्र रद्द करण्यात येत असून त्यांची सक्षम अधिकाऱ्यांकडुन फेर तपासणी करून त्यावर यथाशीघ्र निर्णय द्यावा, असे नमूद केले आहे.

त्यामुळे सदर प्रमाणपत्रे रद्द करण्यात येत असुन नागरीकांनी या कार्यालयात पुन्हा अर्ज करून जन्म मृत्यू अनुपलब्धता प्रमाणपत्र नव्याने प्राप्त करून घ्यावे व मा. तहसीलदार यांचे आदेशान्वये आदेश पारित केल्यावर पुन्हा जन्म किंवा मृत्यु प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्यात येतील यांची नागरीकांनी नोंद घ्यावी.

जावक क्रमांक :
१) कडोंमपा/जन्म-मृत्यू नोवि/१५२०
उप निबंधक यांचे कार्यालय
दि. २८/०५/२०२५
२) कडोंमपा/जसंवि/मुका/१५७
दि. २८/०५/२०२५

सही /-
निबंधक तथा
प्र. वैद्यकिय आरोग्य अधिकारी

# दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांचा कौतुक सोहळा



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : नुकत्याच जाहीर झालेल्या निकालाने दहावी बारावीच्या विद्यार्थ्यांच्या मनांत आता पुढे काय ? या प्रश्नाने काहूर माजलेले असते, अशातच विश्वसनीय आणि अनुभवी मार्गदर्शक लाभला तर मनावरचा ताण हलका होतो व मार्ग मिळतो. अशाच एका ध्येय मार्गदर्शनाचे शिबिराचे आयोजन जे एम एफ शिक्षण संस्थेमध्ये मधुबन वातानुकुलीत दालनामध्ये केले गेले.संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ राजकुमार कोल्हे, सचिव संस्थापिका डॉ प्रेरणा कोल्हे, खजिनदार जान्हवी कोल्हे तसेच अभियांत्रिकी मध्ये सुवर्ण पदक विजेते प्रोफेसर डॉ दिनेश गुप्ता, आयोजक तथा जेष्ठ नगरसेवक विश्वनाथ राणे, माजी महापौर विनिता राणे, समाजसेवक मुकेश पाटील, माजी नगरसेविका संगीता पाटील तसेच इतर पदाधिकारी यांची उपस्थिती प्रार्थनीय होती.

लॉक डाऊन सारख्या प्रतिकूल काळात देखील ३०० पेक्षा जास्त ऑनलाइन वेबिनार, सेमिनार घेऊन सर्व विद्यार्थ्यांना मनस्वी मार्गदर्शन करणारे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ राजकुमार कोल्हे यांनी आजच्या मार्गदर्शन शिबिरामध्ये अनन्यभावे त्यांना समजून उमजून घेऊन योग्य ते मार्गदर्शन केले. प्रत्येक विद्यार्थ्याची इच्छा ही इंजिनिअर, डॉक्टर, वकील, प्रोफेसर होण्याची असते, काही वेळेस कमी गुण अभावी त्यांना पाहिजे त्या क्षेत्रात जाता येत नाही, परंतु अशा विद्यार्थ्यांनी खचून न जाता त्या क्षेत्राशी निगडीत आलेले असंख्य क्षेत्र आहेत आणि ती तुमच्या साठी सुवर्णसंधी ठरू शकते असे संस्थापक अध्यक्ष डॉ राजकुमार कोल्हे यांनी आपल्या मार्गदर्शनात नमूद केले. अनेक मोठ्या अयशस्वी व्यक्ती यशस्वी कशा झाल्या याचे उत्तम उदाहरण देताना यशस्वी कथा वाचू नका, त्यानी केवळ संदेश मिळतो, अपयशाच्या कथा वाचा, त्याने यशस्वी होण्यासाठी कल्पना मिळतात असे दिवंगत राष्ट्रपती एपीजे अब्दुल कलाम यांचे विचार सांगितले. आज नावीन्यपूर्णतेने अनेक शैक्षणिक क्षेत्राचे दरवाचे उघडे आहेत, ज्या क्षेत्रात मन रमते, बुद्धीला चालना मिळते, काहीतरी करण्याची उमेद वाढते नक्कीच अशा क्षेत्राची निवड करा असा सल्लाही दिला.

तर प्रोफेसर डॉ.दिनेश गुप्ता यांनी सांगितले की, जगण्याचा दर्जा हा आपल्या विचारांवर असतो, परिस्थितीवर नाही. तेव्हा विचार उज्वल ठेवूनच क्षेत्र निवडा, ह्या विचारांनीच तुम्ही परिस्थिती बदलू शकता.सदर मार्गदर्शन शिबिरामध्ये सुमारे 250 च्या वर विद्यार्थांनी व पालकांनी हजेरी लावली होती. प्रत्येक मुलाच्या प्रश्नाचे समाधान कारक व विश्वसनीय उत्तरे सर्वच मान्यवरांकडून मिळाली. सर्व उपस्थित मान्यवरांनी सर्व विद्यार्थ्यांना भावी वाटचाली साठी शुभेच्या देऊन फुल न फुलाची पाकळी म्हणून कौतुकास्पद भेट डॉ कलाम यांचे अग्निपंख पुस्तक दिले.

# राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या बैठकीत महापालिकेची मोर्चेबांधणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



कल्याण : राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष प्रदेशाध्यक्ष जयंतराव पाटील यांच्या आदेशाने कल्याण डोंबिवली जिल्हा कार्यकारणीची बैठक जिल्हाध्यक्ष वंडार पाटील तसेच निरीक्षक महेश तपासे यांच्या नेतृत्वाखाली नुकतीच संपन्न झाली. होऊ घातलेल्या कल्याण बाजार समिती निवडणुकीसाठी इच्छुक उमेदवारांची नावे द्यावी तसेच बाजार समितीच्या इलेक्शन मध्ये आपल्या पक्षाची जास्तीत जास्त उमेदवार निवडून यावे यासाठी सर्वांनी प्रामाणिक प्रयत्न केले पाहिजे, तसेच कल्याण डोंबिवली महापालिका निवडणुकीसाठी ही बूथ प्रमुख, वॉर्ड अध्यक्ष विधानसभा अध्यक्ष, कार्याध्यक्ष यांनी आपापल्या विभागात वॉर्ड स्तरावर मीटिंग लावून संघटनेच्या माध्यमातून नागरिकांचे हिताचे कार्यक्रम लावावे.

आपल्या प्रभागात ज्या नागरी समस्या असतील त्या महानगरपालिकेच्या माध्यमातून सोडवाव्या. महिला तसेच ओबीसी सेल अल्पसंख्यांक विभाग , युवक पदाधिकारी यांनीही मीटिंग घेऊन पद्मभूषण शरदचंद्र पवार यांचा पक्ष हा शेवटच्या घटकापर्यंत गेला पाहिजे व लोकभीमुख कार्य करून आपल्या पक्षाचा ठसा उमटवला पाहिजे असा संकल्प करा असे प्रतिपादन जिल्हाध्यक्ष वंडार पाटील तसेच निरीक्षक महेश तपासे यांनी केले.

याप्रसंगी ओबीसीचे ठाणे जिल्हा अध्यक्ष शोभा म्हात्रे, महिला पदाधिकारी किरतकर तसेच कल्याण पश्चिम विधानसभा कार्याध्यक्ष प्रशांत माळी, ग्रामीणचे विधानसभा अध्यक्ष मधुकर माळी, माजी नगरसेवक उमेश बोरगावकर, शिक्षक सेलचे खाडे, युवक चे अध्यक्ष ओम सावंत , कार्याध्यक्ष निखिल कदम , तसेच शेकडो पदाधिकारी उपस्थित होते.

# ‘अवयवदान’ एक सामाजिक बदलाची चळवळ व्हावी

## - आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : कुटुंबातील आपला जीवाभावाचा माणूस निघून गेल्यानंतर, ज्या कुटुंबांनी सामाजिक भान जागृत ठेवून अवयवदान करण्याचा निर्णय घेतला त्यांचे मी मनापासून आभार मानतो, त्यांच्या या निर्णयामुळे अनेकांच्या जीवनात नवीन ज्योत प्रज्वलित झाली असून, नव्याने जीवनदान मिळाले आहे, असे प्रतिपादन सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी केले.

मुंबईतील सायन रुग्णालयातील झेड. टी.सी.सी. (ZTCC) या संस्थेच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त रुग्णालयात अवयवदान केलेल्या कुटुंबातील सदस्यांचा सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री श्री. आबिटकर यांच्या हस्ते स्मृतीचिन्ह देवून सन्मान करण्यात आला त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाला झेड.टी.सी. सी.चे अध्यक्ष डॉ.एस. के.माथूर, न्यायमूर्ती संदीप शिंदे, आरोग्य संचालक डॉ.नितीन अंबाडेकर, मुंबईतील खासगी व शासकीय रुग्णालयातील तज्ज्ञ उपस्थित होते.

मंत्री श्री.आबिटकर म्हणाले की, समाजात अवयवदानाबद्दल असलेले गैरसमज, अकारण भीती, सामाजिक रूढी, चालीरिती या बाजूला ठेवून वेळ प्रसंगी सामाजिक विरोध पत्करून आपण विज्ञानवादाकडे जाणारा अवयवदानाचा विवेकी निर्णय घेतला आहे. त्यामुळे आपण समाजाचे आयडॉल बनला आहात. अलीकडच्या काळात अवयवदानाच्या प्रतीक्षेत असलेल्या रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढते आहे. हजारो रुग्ण किडनी, लिव्हर, हृदय अशा अवयवांच्या प्रतीक्षेत असतात. पण प्रत्यक्षात अवयवदानाचं प्रमाण अल्प आहे. त्यामुळे अवयवदानाविषयी समाजात जागृती आणि विश्वास निर्माण करणे, ही आपल्या सगळ्यांची जबाबदारी आहे.

आरोग्य व वैद्यकीय शिक्षण विभागाने नुकतीच एक महत्त्वपूर्ण बैठक घेतली. त्यात कोल्हापूर, सोलापूर, अमरावती आणि नाशिक येथे नव्या झेड.टी.सी.सी. केंद्रांची स्थापना करण्याचा निर्णय घेण्यात आला. झेडसीसीची टीम, संलग्न रुग्णालये, आरोग्य विभाग अतिशय चांगल्या पद्धतीने काम करत आहेत. हे काम एक मिशन म्हणून हाती घेणे आवश्यक आहे. यासाठी रुग्णालयाने केवळ सहभाग नव्हे, तर पुढाकार घ्यावा, योग्य समुपदेशनाद्वारे कुटुंबीयांमधील भीती, अंधश्रद्धा दूर करावी, ग्रामीण भागात जागरूकतेसाठी विशेष मोहिमा राबवाव्यात. हे संपूर्ण कार्य ही केवळ वैद्यकीय बाब नाही, तर ही मानवतेची, आणि सामाजिक बदलाची चळवळ आहे, असेही मंत्री श्री. आबिटकर यांनी यावेळी सांगितले. महाराष्ट्र राज्य अवयवदानाच्या क्षेत्रात देशात आदर्श ठरेल, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

झेड.टी.सी.सी. चे सेक्रेटरी भरत शहा यांनी सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री श्री. आबिटकर यांचे स्वागत केले व अवयव दान कार्ड काढण्याचे आवाहन केले. अवयव प्रत्यारोपणाच्या क्षेत्रात चांगली कामगिरी केलेल्या अपोलो, ब्रिच कँडी, क्रिटीकेअर एशिया, हिरानंदानी, फोर्टीस, एशियन रिलायंस, ग्लोबल, जसलोक, ज्यूपिटर, लिलावती, के.ई.एम. अंबानी, जी.एस. सी, कोकिलाबेन इत्यादी रुग्णालयातील प्रतिनिधींचा यावेळी सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

# पावसाळ्यात रानभाज्याची पर्वणी

## खाणा-यांची चंगळ

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



पेण : पावसाळा सुरू झाला म्हणजे रानभाज्यांची पर्वणीच असते. काही भाज्या पावसाळ्यापूर्वी उगवतात तर काही भाज्या पावसाळ्यात उगवतात. शेवाळा, कुडा, आकुड इत्यादी रानभाज्या पावसाळ्यापूर्वी उगवतात या रानभाज्या खायला चवदार व पौष्टिक असतात.

गेल्या काही दिवसांपासून रानभाज्यांना बहर आला आहे. जिल्ह्यातील बाजारपेठेत रानभाज्या मोठ्या प्रमाणात विक्रीसाठी येत असून, रानभाज्यांना मोठी मागणी आहे. पावसाळ्यापूर्वी रानात कुडा, शेवला, आकुड इत्यादी रानभाज्या मोठ्या प्रमाणात उगवतात. या रानभाज्या खायला चविष्ट व पौष्टीक असतात. पावसापूर्वी ऋतूत येणाऱ्या या भाज्या खवय्यांच्या पसंतीच्या असून, या ऋतूत या भाज्यांना चांगली मागणी आहे.रानात रानभाज्या उगवल्या असून पावसाळा जसा वाढत जाईल तशा अनेक भाज्या तयार होणार आहेत. आदिवासी स्त्रिया रानावनात फिरून सदर भाज्या मिळवतात. या भाज्या विकून त्यांना रोजगार मिळत असून, आर्थिक उत्पन्नाचे साधन उपलब्ध होत आहे. 80 ते 100 रुपयांना तीन जुड्या मिळत आहेत. आवक वाढेल तशी दहा रुपये प्रति जुडी मिळेल. पावसाळयात मिळणाऱ्या या भाज्या खरेदी करण्यासाठी प्रवासी व नागरिक आवर्जून थांबून सदर भाज्या खरेदी करत आहेत.पेण शहरात मोठ्या प्रमाणात रानभाज्या तयार झाल्या आहेत.

## मंत्रिमंडळ निर्णय

# शेतीच्या वाटपपत्र दस्तावरील नोंदणी शुल्क माफ

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शेत जमिनीच्या वाटपपत्राच्या दस्तावर आकारण्यात येणारे नोंदणी शुल्क माफ करण्याचा निर्णय आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, 1966 च्या कलम 85 नुसार शेत जमिनीचे वाटप करताना मोजणी करून वाटपाच्या दस्तास मुद्रांक शुल्क आणि नोंदणी शुल्क द्यावे लागते. शेत जमिनीच्या वाटप पत्रास मुद्रांक शुल्काचा दर नाममात्र आहे मात्र नोंदणी शुल्काच्या बाबतीत सवलत नाही. मुद्रांक शुल्कापेक्षा नोंदणी शुल्क अधिक असल्याने अनेक शेतकरी दस्तांची नोंदणी करीत नाहीत. नोंदणी न केल्यामुळे भविष्यात शेत जमिनीवर वाद निर्माण झाल्यास त्याचा शेतकऱ्यांना आणि त्यांच्या कुटुंबियांना नाहक त्रास सहन करावा लागतो. त्यामुळे अशा दस्तांना नोंदणी शुल्क माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला. यामुळे शेतकऱ्यांना वाटप पत्राची नोंदणी सहजपणे करता येईल. या निर्णयामुळे शासनाच्या महसुलात दरवर्षी 35 ते 40 कोटी रुपयांची घट येऊ शकते. मात्र शेतीच्या वाटप पत्राची नोंदणी न केल्यामुळे शेतकऱ्यांना होणाऱ्या त्रासातून सुटका करण्यासाठी नोंदणी शुल्क माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला.




# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंती वर्षानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता




कल्याण : महाराष्ट्र शासन, सांस्कृतिक कार्य विभाग, सांस्कृतिक कार्य संचालनालय महाराष्ट्र राज्य, मुंबई आणि नृत्येश्वर फाउंडेशन ऑफ आर्ट्स अँड कल्चर यांच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंती वर्षानिमित्त भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन गुरूवार दिनांक २९ मे रोजी सायंकाळी ७:३० वाजता कल्याणच्या आचार्य अत्रे रंगमंदिरात करण्यात आले आहे.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांच्या पुढाकाराने हा कार्यक्रम होत आहे. यामध्ये अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवन चारित्रावर आधारित नाट्य संगीत, नृत्य, माहितीपट असा भव्य सांस्कृतिक कार्यक्रम पार पडणार आहे. या कार्यक्रमासाठी प्रवेश विनामूल्य असून इतिहासाच्या सुवर्ण पानांवरची प्रेरणादायी गाथा अनुभवण्यासाठी अवश्य उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केली आहे.

# केडीएमसी क्षेत्रात कोरोनाचा दुसरा बळी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवली मनपाक्षेत्रात कोरोनाने शिरकाव करीत दोन जणांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याचे समोर आल्याने केडीएमसी क्षेत्रात करोनाने हातपाय पसरण्यास सुरूवात केली असल्याचे दिसून येते. प्रशासनाने कोरोनाच्या संभाव्य पार्श्वभूमीवर आरोग्य यंत्रणा सज्ज असून करोना संदर्भात घेण्याची दक्षता, काळजीबाबत प्रशासनाकडून नागरिकांना अवहान करण्यात आले आहे.

केडीएमसी क्षेत्रातील बुधवारची कोरोना रुग्ण संख्या - ०1 असून एकूण रुग्ण - 8 झाले आहेत. तर यापैकी रुग्णालयात दाखल कोरोना रुग्ण - 2 खाजगी रुग्णालयात असून डिस्चार्ज दिलेल्या कोरोना रूग्ण संख्या 3 आहे. तर

कोरोना अवहाल अंती मृत्यू संख्या - 2 (सहव्याधी) आहे. गृह विलगीकरणात असलेल्या कोरोना रूग्ण संख्या - 1 असून या रुग्णाची प्रकृती स्थिर आहे.

केडीएमसी क्षेत्रात कोरोना मुत्यू झालेल्या पैकी डोंबिवलीतील 67 वर्षाचा इसम ,दि. 24 मे 2025 रोजी खाजगी हॉस्पिटल डोंबिवली येथे ऍडमिट होता. या रुग्णाची आरटीपीसीआर टेस्ट 24 तारखेला केली गेली असता ती पॉझिटिव्ह आली होती. या व्यक्तीस दिनांक 25 मे 2025 रोजी ठाणे येथील कळवा हॉस्पिटल येथे ऍडमिट केले गेले. या व्यक्तीला सहव्याधी म्हणजे हायपरटेन्शनचा व मधुमेहाचा त्रास होता तसेच बारा वर्षांपूर्वी आलेल्या स्ट्रोकमुळे या व्यक्तीस पॅरालिसिसस झाला होता. या व्यक्तीचा मृत्यू दिनांक 28 मे 2025 रोजी सायंकाळी कळवा हॉस्पिटल येथे झाला आहे. या व्यक्तीने कोविड लस घेतलेली नव्हती अशी माहिती वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉक्टर दीपा शुक्ल यांनी दिली आहे.



# पर्यटन सुरक्षा दलाचा विस्तार करणार - पर्यटन मंत्री शंभूराज देसाई

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : पर्यटन स्थळांच्या ठिकाणी सुरक्षा दल हा पर्यटन विभागाकडून नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येत आहे. महाबळेश्वर येथील पर्यटन महोत्सवात या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला असून या उपक्रमाचा विस्तार करण्यात येणार असल्याची माहिती पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी दिली. या संदर्भात मंत्री श्री. देसाई यांच्या मंत्रालयातील दालनात बैठक झाली. बैठकीस आमदार चंद्रकांत रघुवंशी, आमदार महेंद्र थोरवे, पर्यटन संचालक श्री. पाटील यांच्यासह संबधित अधिकारी उपस्थित होते.

मंत्री श्री. देसाई म्हणाले, पर्यटन सुरक्षा दलासाठी महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाकडील अधिकारी-कर्मचारी यांची सेवा घेण्यात येत आहे. सुरवातीच्या टप्प्यात सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर, कास पठार, पाचगणी आणि कोयनानगर येथे हा उपक्रम राबविण्यात येईल. या उपक्रमांतर्गत नियुक्त अधिकाऱ्यांसाठी वाहने घेण्यात यावीत. याबाबतचा प्रस्ताव सादर करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

तत्पूर्वी मंत्री श्री. देसाई यांनी सातारा जिल्ह्यातील कोयनानगर नेहरू गार्डन, स्काय वॉक, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पैठण आणि नंदुरबार जिल्ह्यातील तोरणमाळ येथे विकसित करण्यात येणाऱ्या पर्यटन प्रकल्पासंदर्भात माहिती घेतली. हे प्रकल्प केंद्र शासनाच्या मान्यतेसाठी विहित निकषानुसार तयार करून पाठवावेत आशा सूचनाही त्यांनी दिल्या.

'यशवंतराव चव्हाण पंचायत राज अभियान २०२५' अंतर्गत

# ठाणे जिल्हा परिषदेचा राज्यस्तरीय गौरव

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : ग्रामविकास व पंचायत राज विभाग, महाराष्ट्र शासन अंतर्गत आयोजित 'यशवंतराव चव्हाण पंचायत राज अभियान २०२५' अंतर्गत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पंचायत राज संस्थांना तसेच गुणवंत अधिकारी व कर्मचाऱ्यांना दि. २७ मे, २०२५ रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मंत्रालय, मुंबई येथे आयोजित समारंभात सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमात ठाणे जिल्हा परिषदेच्या अतिशय उल्लेखनीय कार्य करणाऱ्या पंचायत राज संस्थांना आणि गुणवंत अधिकारी/कर्मचाऱ्यांना राज्यस्तरीय पुरस्कार मा. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

यावेळी ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे, ग्रामविकास राज्यमंत्री योगेश कदम, प्रधान सचिव एकनाथ डवले, कोकण विभागीय आयुक्त विजय सूर्यवंशी, तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य पवार, प्रकल्प संचालक छायादेवी शिसोदे व इतर मान्यवर उपस्थित होते.

या अभियानांतर्गत जिल्हा परिषद, वर्धा (तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या कार्यकाळातील कामगिरीसाठी) यांना "यशवंतराव चव्हाण पंचायत राज अभियान 2022-23" अंतर्गत राज्यस्तरीय प्रथम क्रमांकाचे पारितोषिक ( ₹ ३० लाख रक्कमेसह) प्रदान करण्यात आले.

ठाणे जिल्हा परिषदेचे गुणवंत अधिकारी व आदर्श संस्था (राज्यस्तरीय):

गुणवंत अधिकारी / कर्मचारी – सन 2022-23:

1. अविनाश फडतरे – उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन)
2. संगीता रामकृष्ण घुरडे – सहायक लेखा अधिकारी, अर्थ विभाग

आदर्श ग्रामपंचायत अधिकारी – 2022-23:

• विलास कृष्णा मिरकुटे, ग्रामपंचायत अधिकारी, मासले, ता. मुरबाड

गुणवंत अधिकारी – 2023-24:

• अजय वामन भोंडीवले, सहायक प्रशासन अधिकारी, पंचायत समिती, शहापूर

आदर्श ग्रामपंचायत अधिकारी – 2023-24:

• विशाखा विवेक पाटील, ग्रामपंचायत अधिकारी, वाशिंद, ता. शहापूर

अत्युत्कृष्ट विभागस्तर पंचायत समिती पुरस्कार – पंचायत समिती, शहापूर (2023-24):

गट विकास अधिकारी नम्रता जगताप व तत्कालीन गट विकास अधिकारी भास्कर रेंगडे

मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी या गौरवप्रसंगी भावना व्यक्त करताना सांगितले की, "यशवंतराव चव्हाण पंचायत राज अभियान अंतर्गत मिळालेला हा गौरव म्हणजे केवळ संस्थेचा सन्मान नाही, तर जिल्हा परिषदेच्या प्रत्येक अधिकाऱ्याच्या आणि कर्मचाऱ्याच्या समर्पित सेवाभावाची पावती आहे. शासनाच्या योजना प्रभावीपणे राबवण्यासाठी प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि ग्रामपंचायती यांचा समन्वय अत्यावश्यक आहे. ठाणे जिल्ह्यात आम्ही 'सशक्त पंचायत – सक्षम ग्रामविकास' या तत्वावर काम करत असून, हा पुरस्कार आमच्या कार्यपद्धतीला मिळालेली मान्यता आहे."

या उल्लेखनीय यशामुळे ठाणे जिल्हा परिषदेचे नाव राज्यस्तरावर गौरवाने घेतले जात आहे. जिल्हा परिषदेतील अधिकारी, कर्मचारी, तसेच सर्वच स्तरातून पुरस्कारप्राप्त अधिकारी आणि विभागांना शुभेच्छांचा वर्षाव करण्यात येत आहे. हा सन्मान आगामी काळात कार्यक्षमता, पारदर्शकता आणि ग्रामविकासासाठी अधिक प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

# एमआयडीसीच्या आवारात नाल्याचे पाणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : एमआयडीसी निवासी विभागात नवीन गटारे, नाले यांची अर्धवट कामे व अर्धवट साफसफाई तसेच रस्त्यांचे काँक्रीटीकरण करतांना रस्ता उंच ते इमारतीचा काही भाग रस्त्याखाली, अशा सर्व समस्येमुळे बहुतेक गृहनिर्माण सोसायट्यांच्या आवारात पाणी साचले असून ही समस्या पहिल्याच सुरुवातीच्या पावसाने समोर आली आहे. पुढे पावसाचा जोर वाढल्यावर हेच घाण पाणी लोकांच्या घरात शिरणार परिणामी रोगराई वाढून आरोग्याच्या समस्येत वाढ होणार.

येथील एम्स हॉस्पिटल रोडवरील RM 13/14, सुदर्शननगर मधील RX 3, मिलापनगर, सुदामानगर ,अभिनव शाळा परिसर इत्यादींच्या रहिवासी इमारतीचा आवारात पावसाचे आणि गटार, नाल्यामधील घाण पाणी भरत असून त्याचा निचरा होत नसल्याने रहिवाशांना मोठा फटका बसला आहे. याला जबाबदार एमआयडीसी आणि कल्याण डोंबिवली महापालिका असून त्यांनी युद्धपातळीवर ही मोठी समस्या दूर करण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे नाहीतर भविष्यात मोठी समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे.

सद्या एमआयडीसी मध्ये नवीन गटारे, नाले बांधण्याचे काम एमआयडीसीकडून चालू आहे. ती अर्धवट आणि चुकीच्या पद्धतीने चालू आहेत. तर मोठे नाले, गटारे हे साफसफाईचे काम कल्याण डोंबिवली महापालिकेकडून होत आहे. त्यांनीही नाले साफसफाई योग्य पद्धतीने केली नाहीत. काही ठिकाणी नाले सफाईची कामे झालीच नाही. एमआयडीसी व कल्याण डोंबिवली महापालिकेचे ठेकेदार आणि त्यांच्यावर नियंत्रण ठेवणारे प्रशासनाचे अधिकारी याकडे दुर्लक्ष करीत आहेत असे येथील नागरिकांची ओरड आहे. याबाबत संबंधित अधिकाऱ्यां संपर्क केला असता संपर्क होऊ शकला नाही.


## भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी

### पाणी पुरवठा विभाग

**ई- निविदा सुचना क्रमांक ०८ सन २०२५-२६ (पहिल्यांदा प्रसिध्दी)**

**खालील काम करण्याकरीता सक्षम व अनुभवी ठेकेदारांकडून ई-निविदा मागविण्यात येत आहे.**

| अ.क्र. | कामाचे स्वरुप | अंदाजित खर्च | निविदा फॉर्म फी | निविदा विक्री व स्विकारण्याची अंतिम दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कलव्हर्टच्या बांधकामामध्ये बाधीत होणा-या भिवंडी मनपाच्या जलवाहिन्या स्थलातंरीत करण्याबाबत. | रु.३८,५६,३०५/- | रु.२३६०/- | दि. २९/०५/२०२५ ते दि. २३/०६/२०२५ |
| | सदर निविदा बाबतची माहिती मनपा संकेतस्थळावर mahatenders.gov.in वर दिनांक २९/०५/२०२५ पासुन उपलब्ध आहे. | | | |

जा.क्र./ज.सं.वि./५३२ दि. २८/०५/२०२५

सही /-
(संदिप पटणावर)
प्र.कार्यकारी अभियंता (पा.पु.वि.)
भिवंडी नि. शहर महानगरपालिका, भिवंडी.


# धर्मवीर आनंद दिघे क्रीडांगणावर विकासकांचे अतिक्रमण


## शिवसेना ठाकरे गट व ग्रामस्थांचा विरोध

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



कल्याण : कल्याण ग्रामीण विधानसभा क्षेत्रातील मधील गोठेघर येथील धर्मवीर आनंद दिघे क्रीडांगणाच्या जागेवर अतिक्रमण करत येथे इमारती उभारण्याचा घाट घातला जात आरोप ग्रामस्थ करत आहेत. 14 गावातील नागाव ग्रामपंचायतीने ठराव करून 2014 साली गोठेघर येथील मैदान क्रीडांगणासाठी आरक्षित करून ठेवलं होतं. राजकीय शक्ती वापरत विकासकांनी त्यावर कब्जा केला आहे. याविरोधात मंगळवारी शिवसेना ठाकरे गट व ग्रामस्थांनी आक्रमक भूमिका घेत हे मैदान परत द्या अशी मागणी केली. आठ दिवसांत याप्रकरणी ठोस पावले उचलली नाही तर तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा शिवसेना ठाकरे गटाचे उप जिल्हाप्रमुख रमेश पाटील यांनी दिला आहे.

कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील शासकीय जमिनीवर उद्योजक, भूमाफिया, विकासकांनी अतिक्रमण करण्यास सुरुवात झाली आहे. नवी मुंबई जवळील उत्तरशीव गोठेघर भागातील एक भूखंड नागाव ग्रामपंचायतीने 1.3 हेक्टर जागा मैदानासाठी आरक्षित ठेवले आहे. धर्मवीर दिवंगत आनंद दिघे क्रीडांगण असे नाव या मैदानास देण्यात आले आहे. 14 गावांतील मैदानी खेळांच्या स्पर्धांसह सामाजिक उपक्रमांसाठी या मैदानाचा वापर होतो. या क्रीडांगणावर दरवर्षी विविध मैदानी खेळांच्या स्पर्धांसह, सामाजिक कार्यक्रम सुरु असतात. उपमुख्यमंत्री आणि ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदेंचे राजकीय गुरु आनंद दिघे हे देखील या मैदानात क्रीडा स्पर्धांसाठी उपस्थित राहिले आहेत. मात्र सध्या या मैदानावर विकासकांची नजर पडली आहे. विकासकांनी हे मैदान गिळंकृत करण्यास सुरुवात केली असून येथे बांधकाम देखील सुरू करण्यात आले आहे. क्रीडांगणाच्या जागेवर कब्जा केल्यामुळे शिवसेना ठाकरे गट आक्रमक झाला असून मंगळवारी मैदानाच्या जागेवर ठाकरे गट व गोठेघर उत्तरशीव ग्रामस्थांच्या वतीने आंदोलन करत या प्रकल्पाला विरोध करण्यात आला.



# महाकाय लाटा उसळणार

# पावसाळ्यात १८ दिवस धोक्याचे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : यंदाच्या पावसाळ्यात तब्बल १८ दिवस धोक्याचे असून, जून ते सप्टेंबर या चार महिन्यांत १९ वेळा महाकाय अर्थात साडेचार मीटरपेक्षा अधिक उंचीच्या लाटा येऊन समुद्राला मोठी भरती येणार आहे. मोठ्या भरतीच्या दिवशी मुसळधार पाऊस आणि भरती एकाच वेळी आल्यास जिल्हा जलमय होण्याची भीती वर्तवली जात आहे.

जून आणि ऑगस्टमध्ये पाच दिवस अधिक उंचीच्या लाटा येणार आहेत, तर सप्टेंबरमध्ये चार दिवसांत पाच वेळा लाटा येणार आहेत. तसेच जुलै मध्येही चार दिवस सर्वात उंचीच्या लाटांसह भरती येणार आहे. पावसाळ्यातील १८ दिवसांच्या कालावधीत १९ वेळा साडेचार मीटरपेक्षा मोठ्या लाटा येणार आहेत. यामध्ये सर्वात मोठी लाट ही २६ जूनला दुपारी१२वाजून ५५ मिनिटांनी ४.७५ मीटरची लाट येणार आहे, तर सर्वात लहान लाट ही १० ऑगस्ट रोजी दुपारी १२वाजून४७ मिनिटांनी येणार असल्याची माहिती जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सागर पाठक यांनी दिली आहे. दरवर्षी पावसाच्या घडामोडीचा अंदाज घेतला जातो. त्यात भरतीचे दिवस कोणते,

68 गावांना उधाणाचा धोका

मुरूड तालुक्यातील ९, उरणमधील ४, पेण-९, अलिबाग-११, उरण-५, श्रीवर्धन-११, माणगाव-२, महाड-६ आणि म्हसळयातील ११ गावांना उधाणाचा धोका आहे.

# लाडक्या बहिणींचा निधी टप्प्याटप्प्याने वाढविणार

## : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : लाडकी बहीण योजना कदापी बंद होणार नाहीत. तर टप्प्या-टप्प्याने यामध्ये वाढ होईल, विधानसभा निवडणुकीत महायुतीने दिलेली आश्वासने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि मी टप्प्याटप्प्याने पूर्ण करणार आहे. विरोधकांचा तुम्ही सुफडा साफ केला. सर्व मागण्या गोरगरिबांच्या आहेत. सरकार आणि तुम्ही वेगळे नाहीत, असे सांगत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत महायुतीचा भगवा फडकवण्यासाठी सर्वांनी कामाला लागावे, गाव तिथे शिवसेना आणि घर तिथे शिवसैनिक याप्रमाणे काम करावे, असे आवाहन सर्व शिवसैनिक आणि पदाधिकाऱ्यांना केले. हा आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढण्याचा संदेश असल्याची तयारी चर्चा शिवसैनिकांमध्ये रंगू लागली आहे. निमित्त होते नाशिकमधील ठाकरे गटाच्या माजी आमदार निर्मला गावीत यांच्या ठाण्यात झालेल्या पक्ष प्रवेशाचे.

आरोग्य, अध्यात्म आणि आहार या विषयावर आयोजित

# दोन दिवसीय कार्यशाळा यशस्वीपणे संपन्न

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या पुढाकाराने व पंचवटी फार्म्स, शेगाव यांच्या सहकार्याने दि.24 व 25 मे 2025 रोजी टाऊन हॉल, ठाणे येथे "आरोग्य, अध्यात्म आणि आहार" या विषयावर दोन दिवसीय कार्यशाळेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या उपक्रमाच्या आयोजनात ठाणे जिल्हाधिकारी कार्यालय तसेच जिल्हा नियोजन अधिकारी वैभव कुलकर्णी यांनी मोलाचे सहकार्य केले.

कार्यशाळेचे उद्घाटन अप्पर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदीप माने आणि प्र. उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) सचिन चौधर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. या कार्यशाळेस एकूण 51 सहभागी उपस्थित होते. ज्यामध्ये जिल्हा परिषदेचे अधिकारी तसेच आरोग्य विभागातील वैद्यकीय अधिकारी यांचा सक्रिय सहभाग लाभला. कार्यशाळेतील सर्व सत्रांना अत्यंत उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

मानवनिर्मित व प्राकृतिक विज्ञान, आजारांचे संभाव्य कारण, सेवा व सुमिरन या विषयांवर जया काळे यांनी सुबोध व विचारप्रवर्तक मार्गदर्शन केले. योगाभ्यास, आदर्श आहार, प्रोटीनसंबंधी गैरसमज-समज, हॉर्मोनल आरोग्य व जीवनशक्ती याबाबत योगतज्ञ स्नेहल काळे यांनी सखोल माहिती देत प्राणायाम आणि आसनांचे प्रात्यक्षिक सादर केले.

कार्यशाळेदरम्यान आहारामध्ये कच्च्या भाज्या व फळांपासून तयार करण्यात आलेले आरोग्यवर्धक, स्वादिष्ट व नाविन्यपूर्ण पदार्थ सहभागींना पुरविण्यात आले.सर्व सहभागींच्या अभिप्रायानुसार ही कार्यशाळा आरोग्यविषयी जागरूकता निर्माण करणारी आणि आहार-आरोग्य यातील परस्परसंबंध अधिक स्पष्ट करणारी ठरली. ही कार्यशाळा आरोग्याकडे अधिक सजगतेने व सर्वांगीण दृष्टीने वाटचाल करण्यासाठी प्रेरणादायी ठरली. या कार्यशाळेमुळे आहार व आजार यामधील अंत:संबंधाची सखोल जाणीव झाली, असा सकारात्मक आणि आशादायक प्रतिसाद सहभागींकडून प्राप्त झाला.

# सावरकर हे बहुआयामी असे व्यक्तिमत्त्व

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



डोंबिवली : लेखक, कवी, नाटककार आणि तत्त्वज्ञ होतेच पण प्रखर हिंदुत्ववादी विचारांचे तितकेच पुरोगामी द्रष्टे नेते होते. त्यांनी भारताबद्दल गेल्या शतकात सांगितलेल्या अनेक गोष्टी आज तंतोतंत घडताना आपल्याला दिसत आहेत. सावरकरांची आंतरराष्ट्रीय वृत्तपत्रांत दखल घेताना हिंदू देशभक्त अशीच ओळख होत असे. जातपात विरहित हिंदूंचं संघटन व्हावं ही गरज त्यांनी शतकापूर्वीच मांडली हे त्यांचं द्रष्टेपण होतं असे उद्गार सावरकर अभ्यासक आणि लेखक अक्षय जोग यांनी डोंबिवलीतील एका कार्यक्रमात व्यक्त केले. स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या १४२ व्या जयंतीनिमित्त डोंबिवलीतील सावरकर उद्यानात आयोजित कार्यक्रमात अक्षय जोग बोलत होते. "स्वातंत्र्यवीर सावरकरांचे अपरिचित पैलू आणि आजचा भारत" या विषयावर जोग यांचे भाषण झाले त्यास अनेक डोंबिवलीकरांनी गर्दी केली होती.

सावरकरांना इंग्रज घाबरत होते, या संदर्भातील भारतात आणि परदेशात घडलेले अनेक प्रसंग जोग यांनी विशद करून सांगितले. त्यास डोंबिवलीकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सावरकरांच्या मार्सेलसच्या समुद्रातील उडीनंतर फ्रेंच सरकारने सावरकरांना इंग्रजांच्या ताब्यात दिल्याने तत्कालीन फ्रान्स सरकारला त्या काळी त्यांच्या देशात प्रचंड रोषाला सामोरे जावे लागले त्यातूनच सरकारविरुद्ध असंतोषाची ठिणगी पडली आणि तत्कालीन फ्रान्स सत्ताधारी पक्ष पराभूत झाल्याचा इतिहास अक्षय जोग यांनी उलगडून सांगितला. हे ऐकताना श्रोते मंत्रमुग्ध झाले.

सावरकर उद्यानात झालेल्या या कार्यक्रमास भाजपा महाराष्ट्र प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रविंद्र चव्हाण, भाजपा अनुसूचित जाती मोर्चा प्रदेश महामंत्री शशीकांत कांबळे, भाजपा जिल्हाध्यक्ष नंदू परब, भाजपा डोंबिवली ग्रामीण मंडल अध्यक्ष मनीषाताई राणे, भाजपा डोंबिवली पश्चिम मंडल अध्यक्ष प्रियाताई जोशी, डोंबिवली पूर्व मंडळ अध्यक्ष मितेश पेणकर, डोंबिवली पश्चिम मंडळ अध्यक्ष पवन पाटील, जेष्ठ नगरसेवक राहुल दामले, पप्पू म्हात्रे, निलेश म्हात्रे, विनोद काळण, माजी नगरसेविका खुशबू ताई चौधरी, रेखाताई चौधरी आणि समस्त सावरकर प्रेमी डोंबिवलीकर उपस्थित होते.


जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
**सौ.कमलताई किसन कथोरे कॉलेज, म्हसा** मुंबई विद्यापीठाशी संलग्न
ADMISSION OPEN 2025-26
११ वी व १२ वी ARTS, COMMERCE, SCIENCE
UNDER GRADUATE: B.A. | B.Com. | B.Sc. CHEMISTRY | B.Sc. MATHS | BAF | BMS
POST GRADUATE: M.Sc. CHEMISTRY | M.Com. ADVANCED ACCOUNTANCY | M.A. MARATHI | M.A. ECONOMICS | M.A. SOCIOLOGY | M.A. HISTORY
Look forward to a BRIGHTER FUTURE
7038658191
9130580111


# टोकावडे वन कार्यालय येथे दाखले वाटप शिबीर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



मुरबाड(बाळासाहेब भालेराव) : महाराष्ट्र शासन महसूल विभाग महाराष्ट्र अभियान अंतर्गत जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे व तहसिल कार्यालय मुरबाड यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन टोकावडे वन कार्यालय येथे करण्यात आले होते

सदरचे शिबिराचे आयोजन आमदार किसन कथोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पंचायत समिती माजी सदस्य अनिल घरत, माजी उपसभापती सीमा घरत यांनी केले होते.

यावेळी मुरबाड तहसीलदार अभिजीत देशमुख, टोकाकडे पोलीस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक दिनकर चकोर,नायब तहसीलदार अमोल शिंदे, जिल्हा परिषद माजी सदस्य संजय पवार, खरेदी विक्री संघाचे माजी अध्यक्ष प्रकाश पवार, सामाजिक कार्यकर्ते जाँटी बोराडे, काळूराम घोलप, रमेश उघडा यांनी शिबिर यशस्वी करण्यासाठी विशेष सहकार्य केले.अशा प्रकारच्या शासकीय योजनांचा लाभ व ४३३दाखल्यांचे वाटप एका छताखाली नागरिकांना यावेळी देण्यात आल्याची माहिती नायब तहसीलदार अमोल शिंदे यांनी दिली आहे.

**विविध प्रकारचे दाखले वाटप केले ते पुढील प्रमाणे**

- ✻ पुरवठा नाव वाढवणे :१
- ✻ संजय गांधी योजना : ३
- ✻ वार्षिक त्रेवार्षिक उत्पन्न दाखले : ३०५
- ✻ जातीचे दाखले : २०
- ✻ आरोग्य विभाग : २५
- ✻ शिधापत्रिका वरील नाव कमी करणे : १
- ✻ शिधापत्रिका वर नाव वाढविणे :१
- ✻ डेमोशील दाखले : ५९

असे मिळून ४३३ दाखले एका छताखाली वाटप करण्यात आले आहे.

– अभिजीत देशमुख, तहसीलदार मुरबाड


जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
**जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली**
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!
१ बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) कालावधी १ वर्ष
२ पॅथॉलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) कालावधी १ वर्ष
३ जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) कालावधी १ वर्ष
४ डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) कालावधी २ वर्ष
५ सिक्युरिटी अँड फायर प्रिव्हेंशन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) कालावधी ६ महिने
पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558


'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024